माहे मे २०२० मध्ये मुदत संपणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील वाडी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुधारीत प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२०.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का-६
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १२ मार्च २०२०

संदर्भ: १) शासनाचा सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र १. दि.२७ जानेवारी,२०२०
२) राज्य निवडणूक आयोगाचा आदेश क्रमांक -रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का-०६, दि.६ फेब्रुवारी, २०२०
३) राज्य निवडणूक आयोगाचा नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित प्रभाग रचना,आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२०, दि. १० फेब्रुवारी, २०२०.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए मधील तरतुदीनुसार नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

२. आणि ज्याअर्थी, भारतीय संविधान व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेची/ नगरपंचायतीची मुदत संपण्यापूर्वी तिची सार्वत्रिक निवडणूक घेणे आवश्यक आहे.

३. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचा नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम - २०२० नुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांनी नगरपरिषद वाडी, जि. नागपूरचा अंतिम प्रभाग रचना मंजुरीकरिता प्रस्ताव सादर केला आहे. यामध्ये खालील कागदपत्र सादर करण्यात आलेले आहेत:-

i. प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे (मुद्रीत तसेच गुगल अर्थ केएमएल फाईल्स)

ii. परिशिष्ट १ ते १३

iii. प्रारूप प्रभाग रचना व आरक्षण सोडत याबाबत आलेल्या हरकती- सूचना

iv. हरकती व सूचनांवर जिल्हाधिकारी यांनी सुनावणीअंती दिलेले अभिप्राय

४. आणि ज्याअर्थी, प्रस्तुत प्रस्तावातील सदर कागदपत्रांची तपासणी केली असता असे आढळून आले की, प्रभाग रचनेनुसार तयार करण्यात आलेल्या परिशिष्ट १ ते ७ तसेच सन २०१५ मधील निवडणुकीचे प्रभागनिहाय आरक्षणाचे राजपत्र, चे अवलोकन केले असता, असे दिसून आले की, प्रभाग क्रमांक २३ मध्ये मागील निवडणुकीचे आरक्षण नोंदविताना चूक झाली आहे. याबाबत सखोल तपासणी केली असता प्रभाग क्रमांक २३ मधील चारही प्रगणक गटनिहाय (खाली दिलेल्या तक्त्यानुसार) आरक्षणानुसार प्रभागाचे अजा स्त्री असे २०१५ निवडणुकीचे आरक्षण येत असून सदर प्रभाग २३ हा २०२० मधील निवडणुकीकरिता पुन्हा अजा स्त्री होऊ शकत नाही. आरक्षण धोरणानुसार उतरत्या क्रमाने येणारा पुढील प्रभाग म्हणजे प्रभाग क्रमांक १७ हा अजा करिता आरक्षित होणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे ही चूक दुरूस्त करणे अपरिहार्य आहे.

| अ.क्र. | प्रगणक प्रभाग | प्रगणक क्रमांक | एकूण लोकसंख्या | जुना प्रभाग (२०१५) | आरक्षण (२०१५) प्रवर्ग | आरक्षण (२०१५) स्त्री | नवीन प्रभाग (२०२०) | आरक्षण (२०२०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०००१ | ००७९०२ | ८८४ | २१ | नामाप्र | स्त्री | २३ | अजा स्त्री |
| २ | ०००१ | ००८१०० | ७०३ | २३ | अजा | - | २३ | अजा स्त्री |
| ३ | ०००१ | ००८६०० | १९५ | २४ | अजा | स्त्री | २३ | अजा स्त्री |
| ४ | ०००१ | ००६९०१ | ५७१ | २५ | अजा | स्त्री | २३ | अजा स्त्री |

५. आणि ज्याअर्थी, प्रभाग क्रमांक २३ च्या ऐवजी प्रभाग क्रमांक १७ हा उतरत्या क्रमाने अजा करिता आरक्षित झाल्यानंतर पुढील प्रक्रिया म्हणजे अजा स्त्रीची सोडत, अज स्त्री सोडत, नामाप्र सोडत, नामाप्र स्त्री सोडत आणि सर्वसाधारण स्त्री सोडत या सर्वांवर परिणाम होणार आहे. त्यामुळे संपूर्ण सोडत नव्याने घेणे आवश्यक आहे. सदर चूक ही २०२० निवडणुकीतील आरक्षण व चक्र यावर परिणाम करत असून, भविष्यातील निवडणुकांच्या आरक्षणावरदेखील परिणाम करत आहे.

६. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग संविधानिक जबाबदारी पार पाडत असताना अशी चूक निदर्शनास आली, जिचा या निवडणुकीवर तसेच भविष्यातील निवडणुकीवर परिणाम होणार असल्याने, सदर चुकीकडे दूर्लक्ष न करता सदर चुकीची तात्काळ दुरूस्ती करणे योग्य व न्यायिक आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे.

७. त्याअर्थी, संविधानातील २४३ झेड ए आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १० व १० अ (४) मधील प्राप्त अधिकारांचा वापर करून, मी यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे:

**आदेश**

१. राज्य निवडणूक आयोगाने वाडी नगरपरिषद, ता. व जि. नागपूर या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सन २०२० सार्वत्रिक निवडणुकीचा दि.१० फेब्रुवारी २०२० रोजी निर्गमित केलेला सुधारीत प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम २०२० मधील परिशिष्ट-२ टप्पा क्रमांक अ (४) मध्ये झालेल्या चुकीमुळे; सदर टप्पा क्रमांक अ (४) मधील आरक्षणाच्या सोडतीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२. वाडी नगरपरिषद, ता. व जि. नागपूरच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता नवीन प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम सहपत्र -१ नुसार जाहीर करण्यात येत आहे. पूर्वीच्या दि.१० फेब्रुवारी २०२० रोजीच्या प्रभाग रचना कार्यक्रमांतर्गत पूर्ण करण्यात आलेली टप्पा क्रमांक अ (१) व अ (२) मधील कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच टप्पा क्रमांक ब (२) मध्ये प्राप्त झालेल्या १४ हरकती या नव्याने प्राप्त होणाऱ्या हरकतींसह सहपत्र १ मध्ये दर्शविलेल्या सुधारीत कार्यक्रमांतर्गत अंतिम प्रभाग रचना करताना विचारात घेतल्या जातील.

(यु. पी. एस. मदान)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रत:-

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. विभागीय आयुक्त, नागपूर व जिल्हाधिकारी, नागपूर.
४. मुख्याधिकारी, नगरपरिषद वाडी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने
६. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई व नागपूर खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
७. निवड नस्ती/ का-६.

# सहपत्र-१

## वाडी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२०

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/नपा-२०१९/प्र.क्र.१२/का.६ दि.१२/०३/२०२० सोबतचे सहपत्र)

## सोडत, प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी, हरकती व सूचना तसेच सुनावणी व अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी इत्यादिचा सुधारित कार्यक्रम

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगर परिषदांच्या वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | १३/०३/२०२० (शुक्रवार) |
| २. | नगर परिषदांच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | १६/०३/२०२० (सोमवार) |
| | **ब) हरकती व सूचना मागविणे तसेच सुनावणी देणे** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना (कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी हरकती व सूचना मागविणेकरिता वेबसाईवर उपलब्ध असल्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदांच्या वेबसाईटवर नोटीस प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १८/०३/२०२० (बुधवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | १८/०३/२०२० (बुधवार) ते २०/०३/२०२० (शुक्रवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | २४/०३/२०२० (मंगळवार) पर्यंत |
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन राज्य निवडणूक आयुक्त यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | २६/०३/२०२० (गुरुवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | राज्य निवडणूक आयुक्त | ३०/०३/२०२० (सोमवार) पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना** **(प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना प्रसिध्द करुन त्याची सूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ३१/०३/२०२० (मंगळवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\kesharsing.sulane\Desktop\सहपत्र-४.docx